# अभंग-व्रतें

9043

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२५९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विषय
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

REFBK-0008077
REFBK-0008077

★

विनोबा

९८५३

# अभंग-व्रतें

★

विनोबा

अनुक्रम १५८७३
विभाग
क्रमांक ९२५५
नों.

REFBK-0008077
REFBK-0008077

अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन ।।
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना ।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ।।

ग्रं. क्र. ८०७७

ग्राम-सेवा-मंडळ, वर्धा

१९५३ ) ( सहा आणे

# विषयानुक्रमणी


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | चार शब्द ... ... | ३ |
| २. | निवेदन ... ... | ४ |
| ३. | सत्य ... ... | ५ |
| ४. | अहिंसा ... ... | १३ |
| ५. | ब्रह्मचर्य ... ... | २३ |
| ६. | अस्वाद ... ... | ३० |
| ७. | अस्तेय ... ... | ३८ |
| ८. | शरीरश्रम ... ... | ४३ |
| ९. | अभंगसूचि ... ... | ४९ |
| १०. | कठिण शब्दार्थ ... ... | ५१ |



आवृत्ति दुसरी प्रति २०००

प्रकाशक
**रामदासभाओ**
मंत्री,
ग्राम सेवा मंडळ, वर्धा

मुद्रक
**गं. ना. सराफ**
प्रबंधक,
श्रीकृष्ण प्रि. वर्क्स, वर्धा

अनुक्रम ९-८०४७
विभाग सं: काव्य
क्रां. ७२८८
नों. २६९१५

# चार शब्द

"अभंग-व्रतां"ची दुसरी आवृत्ति निघत आहे. तिच्यासाठीं मी चार शब्द लिहून द्यावे अशी भाऊची मागणी. काय लिहायचें ? दहा वर्षांहून अधिक अवधी लोटला. मी अजून सगळ्या व्रतांचें विवरण पुरे करूं शकलों नाहीं. दरम्यान, शरीर-श्रमावर तेवढें लिहून झालें. तें या आवृत्तींत जोडलें आहे. माझ्या हातून व्रत-पाठाचे हे अभंग पुरे व्हावे अशी माझी अिच्छा आहे. पण निवांत वेळ मिळेल तेव्हां खरें. सध्या प्रजासूय यज्ञाची दीक्षा घेतली आहे, त्यामुळें लवकर योग दिसत नाहीं. मी तर दुसरी आवृत्ति काढण्याची कल्पना च करीत नव्हतो. पूर्ण होअील तेव्हां काढूं, असें मनांत होतें, पण लोकांच्या मागणी वरून अर्धे मुर्धे जें झालें. आहे तें पुनः प्रकाशित केलें जात आहे. वाचकांनीं तसें च गोड करून घ्यायचें ठरविल्यामुळें माझा नािअलाज आहे.

चांडिल
१२-१-५२

विनोबा

# अभंग-व्रतें

## निवेदन

१ प्रेरणा परमात्म्याची महात्म्याची प्रसन्नता
वाणी संत-कृपेची ही विन्याची कृति-शून्यता

२ सत्याग्रह-गुरूचें हें मोहनाचें तमोहन
ज्ञान-विज्ञान-संपन्न मोह-मोचन दर्शन

३ अम्लान-व्रत-पुष्पांची मंजु मंगल माळ ही
रहावी सर्वदा कंठीं रमावी हृदय-स्थळीं

४ मूळची मोकळी गद्य गूजरी साजरी गिरा
न भंगितां अभंगांत गुंफिली परमादरें

५ अद्वितीय चि एकत्व गुरूचें गौरवूनि जें
विन्या शून्य विना-भूत फावला गणितापरी

सत्य हें चि नाम सत्य हें चि रूप
सत्य चि संकल्प ईश्वराचा ।
शासकावांचूनि आमुचें न चाले
ह्यामुळें रूढलें ईश्वर-नाम ।
विचारितां खोल सत्य-नाम एक
पूर्णार्थ-सूचक **विन्या** म्हणे ॥

४

४ ब्रह्म सत्यं हा तों लौकिक उच्चार
तात्त्विक विचार सत्यं ब्रह्म ।
सूर्य तेथ प्रभा सत्य तेथ ज्ञान
विशुद्ध विज्ञान चिद्रूप जें ।
सत्य ज्ञान दोन्ही मिळतील जेथ
तेथ शोकातीत नित्यानंद ।
सच्चिदानंद ही ऐसी ब्रह्मसंज्ञा
वेदाची जी प्रज्ञा **विन्या** म्हणे ॥

५

५ सत्याचें ह्या आराधन । साधावया हें जीवन
कार्य-मात्र सत्यासाठीं । श्वास-मात्र सत्यासाठीं
ऐसें वळण लागतां । नियम सहज जडती हाता

सत्याविण नियम केला । दंभ अथवा भास झाला
एक्या नियमाचें पालन । शुद्ध न घडे सत्याविण
नियम सत्यें सोपे जाती । **विन्या** म्हणे ही निश्चिती

६

६ सत्य बोलणें हा सत्यार्थ सामान्य
जगीं असे मान्य संकुचित ।
वाणींत कृतींत विचारांत सत्य
विशाळ हा अर्थ घेऊं आम्ही ।
व्यापक हें सत्य संपूर्ण जो जाणे
त्यासि तों जाणणें उरलें नाहीं ।
ज्ञान-मात्र सत्यीं असे सामावलें
सहज हाता आलें **विन्या** म्हणे ॥

७

७ सत्यावेगळें तें ज्ञान मिथ्या होय
आनंदासि सोय तेथें कैंची ।
ज्ञान आनंद ह्या सापेक्ष कसोट्या
भुलवण्या मोठ्या व्यवहारीं ।
सत्याची कसोटी निरपेक्ष निश्चित
सांगेल त्वरित कार्याकार्य ।

पहावें न पहावें पढावें न पढावें
सत्यासि पुसावें **विन्या** म्हणे ॥

८

८ सत्य कामधेनु सत्य परिस-मणि
परी त्रिभुवनीं दुर्लभ कीं ।
सत्याचें तें मुख हिरण्मय-पात्रें
झांकिलें विचित्रें मायामोहें ।
मोह निरसूनि सत्य जडे केंवी
दयावंत दावी उपाय तो ।
अभ्यास वैराग्य हे दोन उपाय
म्हणे करित जाय साक्षेपेंसीं ।
सत्याचा-चि ध्यास ह्या नांव अभ्यास
अन्यत्र उदास वैराग्य तें ।
धन ऋण दोन्ही मिळूनि साधन
परिपूर्ण जाण **विन्या** म्हणे ॥

९

९ साधकांसि येथें असावी सूचना
सत्याची कल्पना बहुविध ।
एकाचें सत्य तें एकाचें असत्य

अनुभव नित्य येईल हा ।
परी येथ नाहीं भिण्याचें कारण
असेल प्रयत्न शुद्ध जरी ।
एकविध भाव मोकळें चिंतन
निष्ठेचे हे दोन पंख थोर ।
गगन-विहारी सत्याची भरारी
दोन्ही पंखांवरी **विन्या** म्हणे ।।

१०

१० पानें मोजितां अगणित । वृक्ष एक हें गणित
तैसीं सत्यें भिन्न भिन्न । मूळ सत्य तें अभिन्न
एक ईश्वरत्व जैसें । भक्तांसाठीं विविध भासे
तैसा सत्याचा स्वभाव । सत्य ईश्वराचें नांव
ज्यासि भासलें जें सत्य । तेणें सेवावें तें नित्य
ह्यांत कांहीं दोष नाहीं । **विन्या** म्हणे कर्तव्य हि ।।

११

११ सत्य देखण्यांत असू शके भूल
आप चि निर्मूळ होईल ती ।
सत्य-शोधकें तों तप चि करणें
आपण सोसणें दुःखभार ।

सत्य शोधण्यांत मरूनि सुटणें
स्वार्थाचें सांडणें करूनियां ।
निःस्वार्थ शोधनीं कुणी अंतवरी
न चुके निर्धारीं विन्या म्हणे ।

१२

१२ चुके ठेंच लागे पुन्हां ये सरळ
सत्याचा प्रांजळ मारग हा ।
सत्याराधना ही भक्ति म्हणविते
फार आवडते हरीतें जी ।
भक्ति परी मिळे जीवचिये साटीं
भ्याडपणें गोष्टी बोलूं नये ।
हरीचें मारगीं नसे हार खाणें
मरूनियां जिणें यंत्र येथ ।
सत्य-चर्या ऐसी करितां ही भली
अहिंसा लाभली विन्या म्हणे ।।

१३

१३ दधीचि प्रह्लाद शिबि हरिश्चंद्र
प्रभु रामचंद्र भीष्मदेव ।

परिग्रहण क्रमांक ... 254345

हसन हुसेन मन्सूर सुक्रात
ख्रिस्त-आदि संत निष्ठावंत ।
प्रसंगीं चिंतावे सत्याचे हे मूर्त
ज्वलंत दृष्टान्त लहानथोरीं ।
चालतां बैसतां खातां पितां गातां
हासतां खेळतां सत्य ध्यावें ।
सत्याचे चि ध्यानीं लावूनियां मन
निर्दोष निःस्वप्न निद्रा घ्यावी ।
रत्न-चिंतामणि संतां सत्य जैसें
आम्हां व्हावें तैसें विन्या म्हणे ॥

# अहिंसा

१

१४ सत्य अहिंसेचा सरळ हा जैसा
अरुंद हि तैसा पंथराज ।
असि-धारा तीक्ष्ण निशिली साहाणे
तीवरी चालणें जणूं येथ ।
दोरी तरी जाड भली डोंबाऱ्याची
सत्य-अहिंसेची फार सूक्ष्म ।
चुकूनि प्रमाद अल्पसा हि झाला
तोल गमावला आला खालीं ।
सावध साधना करी प्रतिक्षण
तेधवां दर्शन **विन्या** म्हणे ।।

२

१५ परी सत्याचें दर्शन । न संभवे देहीं पूर्ण
जरी प्रतिभेनें लक्षून । होऊं शको आकलन
सत्य शाश्वत ती वस्तु । देह नासकी अवस्तु
शाश्वताचा साक्षात्कार । देह केंवी साहे भार
श्रद्धेच्या चि म्हणुनी मागें । **विन्या** म्हणे जावें लागे ।।

३

१६ ह्यांतूनि लाभली युक्ति अहिंसेची
सत्य-शोधकाची जीवन-कळा ।
वाटे जातां आली विषम अडचण
सोडवूं साहून संहारूं वा ।
संहारूं पाहतां प्रगति कुंठित
पुढें जाणें होत साहूनियां ।
प्रथमीं संहारीं कळलें हें तथ्य
शोधीं मी जें सत्य अंतरीं तें ।
संहारें संहारें सत्या अंतरावें
मागें मागें यावें हें चि लाभे ।
मुख्य अंतराय वसे अंतरांत
बाह्य तें निमित्त **विन्या** म्हणे ॥

४

१७ लुटावया चोर येतां । त्यासि दंडूनि लावितां
पळे तेथुनी तो जरी । अन्य घरीं चोरी करी
तें हि आमुचें कीं घर । आंधळी ही कोशिंबीर
चोर कर्तव्य मानुनी । चोरी करी आवर्जुनी
उपद्रव चि थोरावला । **विन्या** म्हणे बोध झाला ॥

५

१८ दंडणें असार साहणें चि सार
सुचला विचार अनुभवें हा ।
साहतां साहतां शोधन होईल
दृष्टि निवळेल दुर्जनाची ।
म्हणूनि प्रयोग नवा आरंभिला
अनुभव तो आला मग नवा ।
आपणावेगळा दुर्जन म्हणूनि
नसे चि तो प्राणी जगामाजीं ।
सखे हे सोयरे सकळ आम्हांसि
दंडावें कोणासि **विन्या** म्हणे ॥

६

१९ परी केवळ साहतां । निपजूं पाहेल भ्याडता
म्हणूनियां शोध केला । धर्म थोर सांपडला
खळ आमुचे सोयरे । आम्ही जरी मानूं खरे
तरी तैशी ती भावना । उमटावी त्यांचे मना
ऐसे उपाय योजणें । आत्मीयता पसरे जेणें
हा चि पंथ अहिंसेचा । **विन्या** म्हणे पुरुषार्थाचा ॥

७

२० सादर सहन प्रखर शोधन
धैर्य-संरक्षण निरंतर ।
ऐसा प्रेम-पंथ राखूं हा जागृत
सकळ पुनीत होती येणें ।
वैरी करी साह्य चोर बंधु होय
वक्रता हि जाय खळाची ती ।
पाउलापाउलीं ईश्वराचें भान
सत्याचें दर्शन अधिकाधिक ।
भासूनि क्लेशाचा असूनि सुखाचा
पंथ अहिंसेचा **विन्या** म्हणे ।।

८

२१ क्लेश जिरविण्यांत वाढे सुख शांति
धैर्याची ती वृत्ति दृढ होय ।
नित्यानित्यभेद नीट कळूं लागे
विवेक उमगे कर्तव्याचा ।
दुरभिमान गळे नम्रता उजळे
परिग्रह तो टळे सहज चि ।
देहाचें मालिन्य झिजत चि जाय
चित्त निरामय **विन्या** म्हणे ।।

९

२२ अहिंसा ही नव्हे वस्तु जी केवळ
उभी राहे स्थूळ दृष्टीपुढें ।
न मारणें सीमा नव्हे अहिंसेची
रेखा आरंभाची शारीर ती ।
कुविचार-मात्र हिंसेचें लक्षण
अनृत-भाषण तें हि हिंसा ।
उतावळी वृत्ति हिंसेची ती मूर्ति
द्वेषाची प्रवृत्ति स्पष्ट हिंसा ।
जग वांछी त्याचें स्वामित्व राखणें
ती हि सूक्ष्मपणें हिंसा होय ।
ह्या सर्वांविगळी पूर्ण वीर्यशाली
अहिंसा बोलिली **विन्या** म्हणे ।।

१०

२३ भुकेलागीं परी सेवूं जातां ग्रास
जगाची ती आस त्यांत गुंते ।
उभे राहूं तेथें असंख्यात जीव
त्यांचा तो चि ठाव संकोचीत ।

काय देह सोडूं तरी न सुटका
अधिक चि देखा गुंत होय ।
देहीं देह-भाव विचारें वर्जून
वर्तणें ही खूण **विन्या** म्हणे ।।

११

२४ विचारें देहाचा संबंध जो फेडी
देह चि तो सोडी त्यासि अंतीं ।
मग अखंडित होय आत्म-भान
सत्य-नारायण त्याचें नांव ।
परी हें दर्शन नसे उतावळें
लाभे योग्य वेळे साधकासि ।
तोंवरी हा देह जाणुनी राखण
घेऊं प्रयोजून साधनेंत ।
साधूनि साधना अनासक्ति–योगें
क्रमूं पंथ वेगें **विन्या** म्हणे ।।

१२

२५ अहिंसेचें सोपेपण । तें चि अत्यंत कठिण
अहिंसा चि सहनवृत्ति । अहिंसा चि अनासक्ति
येथुनी जी तेथवरी । लभ्य होय कैशापरी
लभ्य होतां होतां होय । **विन्या** म्हणे हा निश्चय ।।

१३

२६ येथें एक मानूं जें स्वयं-प्रमाण
असो त्याचें ज्ञान सकळांसि ।
सत्याचें शोधन अहिंसेवांचून
न घडेल जाण कालत्रयीं ।
सत्य अहिंसा हीं नाम-मात्रें भिन्न
तत्त्वतां अभिन्न ओतप्रोत ।
सुषम वस्तूची दोन्ही सम अंगें
डावें उजवें सांगे तेथ कोण ।
सत्य-अहिंसेचा ह्यापरी अभेद
परी एक भेद कल्पूं तेथ ।
सत्य म्हणूं साध्य अहिंसा साधन
चालवूं शोधन विन्या म्हणे ॥

१४

२७ साधन हातीचें ह्यास्तव अहिंसा
परम धर्म ऐसा डंका गाजे ।
सत्य साध्यरूपें म्हणवे ईश्वर
नित्य निर्विकार निरंजन ।

साधन सेवितां साध्य कधीं तरी
अवश्य पदरीं पडेल चि ।
इतुका निश्चय घडतां अंतरीं
जिंकिलें संसारीं **विन्या** म्हणे ॥

१५

२८ कोसळो आकाश भासो चिरडलोंसें
परी हा विश्वासें मंत्र जपूं ।
सत्य नित्य आहे सत्य चि तें आहे
सत्य होउनी राहे परमेश्वर ।
अहिंसा चि एक सत्याचें साधन
कधीं न सोडीन तिची कास ।
सत्य-नारायणा हृदयीं स्मरूनि
संकल्प हा मनीं केला थोर ।
एवढा संकल्प व्हावया सफळ
तो चि देवो बळ **विन्या** म्हणे ॥

# ब्रह्मचर्य

१

२९ ब्रह्मचर्य जाणू साधनेचें बळ
व्रत जें अढळ नैष्ठिकांचें ।
वस्तुतां सत्य हें मूळ महा-व्रत
त्यांतुनी तदर्थ निघती अन्य ।
सत्याचा पुजारी वरला सत्यासि
भजतां अन्यासि व्यभिचारी ।
विकार सेवणें कैसें मग होय
तेणें ब्रह्मचर्य स्वभावें चि ।
प्रवृत्ति रंगली सत्याराधनेंत
विषय-वृत्ति तेथ जूळे केंवी ।
विलासे तों सत्य कोणासि लाभलें
ऐसें न देखिलें **विन्या** म्हणे ॥

२

३० लक्षूनियां अहिंसा हि । निष्कर्ष तो हा चि येई
पूर्ण अहिंसा-पालन । नव्हे ब्रह्मचर्याविण
अहिंसा ती संयम-वृत्ति । ब्रह्मचर्याची जी ख्याति
व्रता व्रता मेळ झाला । **विन्या** म्हणे तो पडताळा

C066

३

३१ अहिंसेचें नाम अनासक्त प्रेम
तें तों स्वात्माराम करूं जाणे ।
जयाची गुंतली विषयीं वासना
क्रोध भय तृष्णा त्याचे पाठीं ।
विकारांची ऐसी मालिका लागली
अहिंसा मोडली भारावून ।
विषयाची गुंत तोडुनी मोकळा
अहिंसक झाला **विन्या** म्हणे ॥

४

३२ अहिंसेचें नास विश्वव्यापी प्रेम
संकुचिता वर्म केंवी लाभे ।
स्त्रियेची पुरुषाची अन्योन्यबद्धता
तिथें व्यापकता कल्पवेना ।
एकमेकांसाठीं प्रेम राखियलें
जगासि उरलें काय मग ।
संकुचित भाव तोडुनी मोकळा
अहिंसक झाला **विन्या** ह्मणे ॥

५

३३ आपुलें वेगळें कुटुंब निर्मितां
विश्व-कुटुंबता दुरावली ।
म्हणूनि विवाह अहिंसा–निष्ठेंत
होय असंगत स्वभावता ।
असंगत जेथ विवाह–विचार
तेंथ अनाचार निषिद्ध चि ।
विकार चि सर्व तोडुनी मोकळा
अहिंसक झाला **विन्या** म्हणे ॥

६

३४ मग जे विवाह करूनि बैसले
सत्यासि मुकले काय सारे ।
काय सर्वार्पण तयांचे हातून
व्हावया साधन नसे कांहीं ।
ह्यासाठीं उपाय थोरांनीं योजिला
अनुभवें चांगला सिद्ध झाला ।
झाला विवाह तो विसरूनि समूळ
वर्तणें निर्मळ **विन्या** म्हणे ॥

७

३५ उभय दंपती भावाबहिणीपरी
देखितील जरी एकमेकां
तरी तो जोजार संपला चि सारा
वासनेचा थारा मोडला कीं ।
माता भगिनी कन्या कल्पितां स्त्री–जाति
उंचावेल वृत्ति त्या चि क्षणीं ।
मोचक सूचक सरस सुंदर
थोर हा विचार **विन्या** म्हणे ॥

८

३६ दंपतींची ह्यांत नसे लेश हानि
लाभाची चि खाणी सांपडली ।
संकोच–निस्तारें कुटुंब विशाळ
प्रेम हि निर्मळ वाढूं लागे ।
अन्योन्यांची सेवा अधिक चांगली
होऊं शके भली निर्विकार ।
एकमेकांतील क्लेशाचें कारण
निरसूनि जीवन गोड होय ।
स्वार्थी संकुचित एकांगी जें प्रेम
क्लेशाचें तें वर्म **विन्या** म्हणे ॥

९

३७ ब्रह्मचर्य-हेतु मुख्य हा कळला
कळूनि ठसला चित्तावरी ।
मग भासतील गौण चि ते सारे
लाभ जे दुसरे शारीरिक ।
वीर्य-हानीचा चि करूनि विलास
पिळणें देहास कैसी मूर्छा ।
देहाचें बुद्धीचें संजीवन-कार्य
साधावया वीर्य अपेक्षित ।
विषय-भोगांत त्याची उधळण
रोगां आमंत्रण **विन्या** म्हणे ॥

१०

३८ ब्रह्मचर्य हें पाळावें काया वाचा मनें
चित्त साह्य केल्याविण विफळ साधनें ।
बाह्य अंकुशांत काय राखुनी शरीर
जरी अंतरीं प्रीतीनें पोषिला विकार ।
वरी वरी संयम केला वृत्ति सोडी स्वैर
अनुभवाचें शास्त्र त्यास म्हणे मिथ्याचार ।
देह-दमनें तो हानि मोकाटितां मन
मनामागें जाय अंतीं **विन्या** म्हणे तन ॥

११

३९ जाणणें अवश्य भेद येथ एक
अन्यथा साधक भांबावती ।
साधकाची दशा आणि मिथ्याचार
ह्यांतील अंतर स्पष्ट व्हावें ।
मन बलात्कारें जाय विषयांत
साधकाचा हेत नसतां हि ।
तेथ त्या मनाशीं साह्य नाकारणें
साधकाची येणें सार्थकता ।
विषयी मनाशीं आंतुनी सहकार
तो चि मिथ्याचार **विन्या** म्हणे ॥

१२

४० देह वश राहे मन फुटूं पाहे
हा तो नित्य आहे अनुभव चि ।
म्हणूनि त्वरित देहासि जिंकूनि
मनाचे दमनीं झटूं सदा ।
प्रयत्नवाद हा साधकासि शोभे
तेणें सिद्धि लाभे परिणामीं ।
देह नियमूनि मनासवें युद्ध
ह्यांत विसंवाद न मानावा ।

देह आवरूनि मनाचें लालन
विसंवाद-खूण **विन्या** म्हणे ॥

१३

४१ ब्रह्मचर्याचें पालन । दुःसाध्य चि मानी जन
ह्याचें शोधितां कारण । दृष्टि-दोष ये उमगून
ब्रह्मचर्याचा तो अर्थ । फार घेती संकुचित
अर्थ-संकोच हा जनीं । **विन्या** म्हणे करी हानि ॥

१४

४२ ब्रह्मचर्य म्हणिजे उपस्थ-संयम
व्याख्या ही निर्भ्रम मानियेली ।
परी एकांगी ती म्हणूनि अयथार्थ
अनुभवें निश्चित कळू आली ।
सकळ इंद्रियें राखणें संयमीं
ह्मचर्य आम्ही त्यास म्हणू ।
इतर इंद्रियें जरी निरंकुश
एक चि तें वश केंवी होय ।
तैसा तो प्रयत्न ठरेल निष्फळ
हयांत काय बोल **विन्या** म्हणे ॥

१५

४३ विषयाचा शब्द श्रवणीं ऐकेल
नयनीं निरखील हीन रूप ।
सविकार रस जिव्हेनें चाखील
करांनीं करील काम्य स्पर्श ।
उत्तेजक गंध घ्राणें स्वीकारील
उघडीं राखील द्वारें ऐसीं ।
वरी ब्रह्मचर्य पाळावें म्हणेल
कैसा तो फळेल मनोरथ ।
आगींत पडूनि जळू नये देह
ऐसी च ती हांव **विन्या** म्हणे ॥

१६

४४ क्षरेल तें जरी एक हि इंद्रिय
तरी ब्रह्मचर्य रिता घट ।
सकळ इंद्रियें रोधितां समवायें
शीघ्र तो साधू ये साधकासि ।
कठिण चि परी होईल सुलभ
जरी घेऊं लाभ अनुभवाचा ।
ब्रह्मचर्याभ्यासीं सर्वांग-संयम
करूं हा नियम **विन्या** म्हणे ॥

१७

४५ रोधूं सर्व चि इंद्रियें । ब्रह्मचर्य तैं साधूं ये
परी त्यांत तें प्रधान । स्वादेंद्रिय घेई स्थान
न रोधितां स्वाद-वृत्ति । विषय सारे फोफावती
म्हणुनी अस्वाद वेगळें । **विन्या** म्हणें व्रत योजिलें ॥

१८

४६ ब्रह्मचर्य सांगे आपुला तो भाव
सकळां स्वयमेव स्पष्टपणें ।
ब्रह्म नांवें सत्य विशाळ जें ध्येय
त्यासाठीं तें योग्य साधन मी ।
नका करूं माझा संकुचित अर्थ
होईल अनर्थ साधकांसि ।
ध्येय पूर्ण राखा साधन हि पूर्ण
शीघ्र चि प्रसन्न होईन मी ।
ब्रह्मचर्याचा हा संदेश उदार
आचरूं तत्पर **विन्या** म्हणे ॥

# अस्वाद

१

४७ ब्रह्मचर्याशीं निगडित । अस्वाद हें असे व्रत
पार उतरो तें साधक । ब्रह्मचर्य हस्तामलक
येथ मुनिवर्य हारले । जणूं नांव चि ते विसरले
परी तैसें चि मोलाचें । **विन्या** म्हणे व्रत हें साचें ॥

२

४८ औषध मानूनि अशन करावें
श्रुति जीवेंभावें सांगतसे ।
दुग्ध फळ धान्य आहार्य जें अन्न
क्षुधा-निवारण औषध चि ।
औषध तें घेऊं हिताचें जाणूनि
न चिंतितां मनीं कडू गोड ।
अधिक हानिकर न्यून वायां जाय
प्रमाण जें योग्य तें चि सेवूं ।
यापरी आहारीं तटस्थ जो भाव
अस्वाद त्या नांव **विन्या** म्हणे ॥

३

४९ स्वल्प हि सेवन चाखूनियां रस
अस्वाद-व्रतास मानवेना ।
रसज्ञ-वृत्तीनें अतिरिक्त सेवन
तें व्रत-भंजन उघड चि ।
स्वाद संपादाया योजिणें मिश्रण
ती तों व्रत-हीन वृत्ति जाणूं ।
लक्षूं जरी त्याचें देहीं प्रयोजन
शास्त्रीय वर्तन तें चि होय ।
बुद्धया आरोपिणें मिथ्या प्रयोजन
तें दंभ-लक्षण **विन्या** म्हणे ॥

४

५० रस-स्वाद-वर्ज शरीर-धारण
कसोटी प्रमाण अंगीकारूं ।
मग भोज्य वस्तु व्यर्थ भाराभर
सोडितील घर आपण चि ।
मोडतां अडगळ मोकळें अंतर
सहज विकार शमतील ।
विकार-शमनें देह अनामय
आत्मरसमय **विन्या** म्हणे ॥

५

५१ बुद्धि-हीन मीन आमिषा भुलून
गळ चि गिळून त्यजीं प्राण ।
रसनेचा दास रसें चि मारिला
जगाचा अंकिला दीनवाणा ।
दुर्जनांची करी नमूनि चाकरी
चातुर्य कुसरी ही च मानी ।
रसना-जयेंविण कदापि जीवन
न राहे स्वाधीन **विन्या** म्हणे ॥

६

५२ अस्वाद-साधन स्वाधीन सुंदर
निवडाया आहार समतोल ।
दुर्लक्षिला परी जनीं हा विषय
विवेक शास्त्रीय मावळला ।
मायबाप मोहें लाड चि करिती
स्वाद शिकविती नानापरी ।
तेणें रोग-बीज शिरे शरीरांत
जिव्हा लोलंगत भ्रष्ट होय ।
शरीर जर्जर विकारी अंतर
भिकार संसार **विन्या** म्हणे ॥

७

५३ नित्य पुरवूनि रसनेचा छंद
भोगी बुद्धी-मंद नाना क्लेश ।
व्यर्थ वेंची धन आटवी जीवन
वैद्यांसि शरण सर्व काळ ।
शरीर इंद्रियें पुरुषार्थ-साधनें
राबवावीं जेणें स्वामीपणें ।
तो हा देह-दास इंद्रियांचा दीन
राहिला होऊन पंगु जैसा ।
दैन्य हें फिटाया अस्वाद-अभ्यास
करणें सोल्लास **विन्या** म्हणे ॥

८

५४ देह नीरोग निर्मळ । लोकीं अत्यंत दुर्मिळ
स्वाद अल्प चि सेविला । देह तेव्हां चि भ्रष्टला
जिव्हा लाळिली कौतिकें । देहा दूषी हें न चुके
मग अगत्य उपवास । **विन्या** म्हणे होय त्यास ॥

९

५५ अस्वाद-व्रताची दुष्कर ही सिद्धि
परी येथ बुद्धि खचूं नये ।

अनुक्र. १५४२३
नं. दि. २५।१२।५७
ालय शाखा

व्रत घेतां क्षणीं तयाचें पालन
न घडे परिपूर्ण संकल्पें चि ।
व्रत घेणें ह्याचा गति-शील अर्थ
झटणें तदर्थ निरंतर ।
काया वाचा मनें मरणान्त झुंजणें
व्रत सार्थ येणें **विन्या** म्हणे ।

१०

५६ व्रत मूल-स्पर्शी अवश्य कठिण
व्याख्या परी न्यून करूं नये ।
ती आत्मवंचना सत्य-विडंबना
तेथून तों पतना आरंभ चि ।
आदर्श चि केला सोईसाठीं क्षीण
सांभाळील कोण साधकासि ।
ह्यासाठीं व्याख्या ती पूर्ण चि घेऊन ।
तोलावा प्रयत्न **विन्या** म्हणे ॥

११

५७ आदर्श चिंतावा देह-निरपेक्ष
तो चि आत्म-साक्ष संकल्पावा ।
सामर्थ्य-सर्वस्व समर्पावें त्यांत
हा होय पुरुषार्थ शोभिवंत ।

देह-पुरीमाजीं पुरुष विराजे
पूरक तो साजे अपूर्णाचा ।
अपूर्णाची पूर्ति पुरुषाचें हें ब्रीद
हा चि आत्म-वाद **विन्या** म्हणे ॥

१२

महा-व्रतें पाळूं शके जो परिपूर्ण
वासना जिरवून सार्वभौम ।
जाणावा तो मुक्त तो चि भगवंत
त्यास कांहीं येथ कृत्य नाहीं ।
आम्ही अल्प जीव जिज्ञासु साधक
सत्याचे शोधक सत्याग्रही ।
प्रयत्न-निष्ठा ही आमुची मिरास
सेवूं ती निरलस सावकाश ।
मग कधीं होऊं ईश-कृपे पात्र
जाळूं रस-मात्र **विन्या** म्हणे ॥

१३

अस्वाद-व्रताची जाणूनि थोरीव
आरंभूं अभिनव त्याचा यत्न ।
त्यासाठीं न लागे करणें रात्रंदिन
आहार-चिंतन घोळघोळूं ।

पाहिजे ती एक अखंड जागृति
जिनें चित्त-वृत्ति आकळेल ।
साधूं देह-कार्य किंवा सेवूं स्वाद
ह्याचा मग भेद उमगूं लागे ।
देखूं स्वाद तो तो तोडूं दृढपणें
मुक्ति-लाभ येणें **विन्या** म्हणे ॥

१४

६० अस्वाद-दृष्टीची एकत्र रसोय
येथ बहु साह्य करूं शके ।
सकळांचें स्वास्थ्य लक्षूनि तटस्थ
रांधितील जेथ रांधणारे ।
साधकासि मग नको खाद्य-चिंता
त्याचें तों सर्वथा सोपें काम ।
रांधिल्यांतुनी जें आपुलें उचित
तें आत्म-संमित स्वीकारावें ।
हरीचें मिश्रण करूनि जेवावें
व्रत संपादावें **विन्या** म्हणे ॥

१५

६१ वस्तुतां अग्नीचा आदर्श स्थितींत
असे मर्यादित उपयोग ।

सूर्यपक्व अन्न बोलिलें अमृत
मानवा विहित तें चि होय ।
निसर्गें योजिला फळांचा आहार
स्वल्पें जो अपार तृप्ति देई ।
परि त्यामधें हि उणा नसे स्वाद
इच्छीतसूं छेद ज्याचा आम्ही ।
ह्या कामीं समर्थ एक चि हत्यार
वैराग्य प्रखर **विन्या** म्हणे ।

१६

६२ देह असे यंत्र मी तों यंत्री आत्मा
निश्चळ ही प्रमा संपादावी ।
अहंता न देहीं कधीं बुडूं द्यावी
विवेकें स्थापावी आत्म्यामाजीं ।
अवश्य यंत्रास स्नेहन तें देणें
जरि काम घेणें त्यापासूनि ।
स्नेहनीं न युक्त त्याग किंवा राग
युक्त ती निःसंग कार्य-दृष्टि ।
अस्वाद साधाया मुख्य हें विज्ञान
जाऊं त्या शरण **विन्या** म्हणे ।

# अस्तेय

१

६३ अस्तेय आमुची अधिकार मर्यादा
सर्वांसि सर्वदा सुखावह ।
देई मर्यादा ही लाभ अमर्याद
भेदें चि अभेद साधूनियां ।
अस्तेय-पालनें कार्पण्य मावळे
विग्रह तो टळे सामाजिक ।
सर्व रत्नें सर्वां सदा उपस्थित
अस्तेय-फलित **विन्या** म्हणे ॥

२

६४ अस्तेयादि जें जें बोलिलेंसें व्रत
सत्य-अहिंसेंत तें सामावें ।
सत्य-अहिंसा हें अभिन्न युगल
व्रतांची सकळ जन्म-भूमि ।
किंवा म्हणूं मूळ सत्य चि तें एक
अहिंसा ही लेक त्याची शोभे ।
अहिंसा ती मग जन्म दे व्रतांसि
लेकुरें सरिसीं माउलीचीं ।
कल्पना ह्या भिन्न अर्थ परी एक
अद्वैत-सूचक **विन्या** म्हणे ॥

३

६५ सत्य तें निश्चळ निर्लिप्त केवळ
शोभतसे मूळ द्वंद्वातीत ।
अहिंसा प्रेमळ करी चळवळ
सत्याचा रसाळ अंकुर तो ।
सत्य तें निर्गुण अहिंसा सगुण
व्रतें सगुणांतून साकारलीं ।
सत्य दुर्विज्ञेय अहिंसा दुष्कर
व्रतांचे प्रकार त्यासाठीं हे ।
वेगळे वेगळे सत्य-अहिंसेचे
पैलू चि ते साचे **विन्या** म्हणे ॥

४

६६ अस्तेय शिकवी सामाजिक धर्म
नका चौर्य-कर्म करूं कोणी ।
तेणें प्रीति लाजे सत्य हि दुरावे
श्रेय न संभवे समाजाचें ।
जाणतां नेणतां सगळे चि परी
करीतसू चोरी थोडीफार
ह्यास्तव पाहिजे वृत्ति सावधान
आणि विश्लेषण **विन्या** म्हणे ॥

५

६७ वस्तु दुसऱ्याची घेतली हिरूनि
संमतीवांचूनि पहिली चोरी ।
वस्तु आपुली हि भोगिली लपवून
घरच्यांपासूनि दुसरी चोरी ।
वस्तु सामूहिक सेविली लपवूनि
समूहा वंचूनि तिसरी चोरी ।
वस्तु अस्वामिक मानुनी उचलली
वाटेवरी पडली चौथी चोरी ।
चोरीचे हे ऐसे प्रकार विवरावे
विवरूनि वर्जावे विन्या म्हणे ।।

६

६८ वर्जिले हे स्थूल चोरीचे प्रकार
अस्तेयाचें घर परी दूर ।
दुसऱ्याची वस्तु मागूनि घेतली
चोरी न बोलिली ती तों जगीं ।।
परी त्या वस्तूची गरज नसतां
चोरी चि तत्त्वतां होईल ती ।
सूक्ष्म हा विवेक पारखिल्याविण
अस्तेय अपूर्ण विन्या म्हणे ।।

७

६९ गरज ती खरी किंवा काल्पनिक
निवाडा अचूक कोण करी ।
खाद्य वस्तूंचा तो मोह महा भारी
गरजा विस्तारी दूरवरी ।
तेणें अंगें चोरी सहज फावली
जीवनीं मुरली कळे चि ना ।
कळे चि ना मूळीं कळली हि सुटेना
विवेक भेटेना विन्या म्हणे ॥

८

७० वाढली गरज चोरींत परिणमे
धरी बहु नामें बहु रूपें ।
एक तो शासक एक तो रक्षक
एक उपदेशक क्रिया-शून्य ।
एक अव्यापारीं नटला व्यापारी
एक धंदे करी माननीय ।
एक काढी कर्ज एक घेई व्याज
एक सोडी लाज याचनेची ।
चोरीचे विचित्र विवर्त हे सारे
विवेकें विचारें ओळखावे ।

राखावा संयम तेथ चौकीदार
तरी चि निस्तार **विन्या** म्हणे ॥

९

७१ संयमाची मात्रा वाढवीत जावी
चाळणा करावी अहर्निशीं ।
गरजा अनेक आटोपितां येती
सोडिल्या सुटती क्रमें क्रमें ।
सत्य सांवराव्या मिथ्या निवाराव्या
गौण आवराव्या यथा-शक्ति ।
येणें आत्मा तोषे शरीर न शोषे ।
समाज हि पोषे **विन्या** म्हणे ॥

१०

७२ मानसिक चोरी ती तों सूक्ष्मतम
तेथ हि संयम पुरवावा ।
वस्तु अनधिकार मनें अभिलाषिली
चोरी च ती झाली बीज रूप ।
मनाची ती चोरी मनें चि हेरावी
मनें चि वर्जावी मनामाजीं ।
प्रक्रिया ही सारी हृद्य मनोमय
अस्तेय-हृदय **विन्या** म्हणे ॥

# शरीर-श्रम

१

७३ देह-परीश्रम जनीं अनिवार्य ।
शोधिलें कर्तव्य शोधकांनीं
मननें अनुभवें गळीं उतरलें ।
जीवनीं मुरलें साधकांच्या
'मजूरी करूनि मिळवा भाकरी' ।
आज्ञा ही ईश्वरी भंगू नये
देहाचें तें अन्न देहें संपादावें ।
चिंतन राखावें आत्म्या साठीं
निढळाचा घाम यज्ञीय तें द्रव्य ।
जीवनाचें काव्य विन्या म्हणे ।।

२

७४ जगावया आम्ही सृष्टीस राबवूं ।
उच्छेदूं मळवूं क्षीण करूं
पूर्तीसाठीं नित्य श्रमरूप यज्ञ ।
सुचवी सर्वज्ञ गीते माजीं
पशूंचें पालन वृक्ष-संवर्धन ।
स्वच्छता-साधन उत्पादन
यज्ञ हे वर्जितां जगीं चोर होणें ।

पाप चि भक्षिणें अन्नमिषें ?
शाप हा टाळाया श्रम-व्रत घ्यावें ।
शतंजीव व्हावें विन्या म्हणे ॥

३

७५ लक्षाधीश लोळे सदा खाटे वरी ।
पाक सिद्ध, परी भूक नाहीं
मिळे गोड घास मुखीं न ये रस ।
मग धरी कास व्यायामाची
हालविणें देह ह्या-ना-त्या प्रकारें ।
देव-बलात्कारें राया रंका
मग कां टाळावा उत्पादक श्रम ।
सकळांचे क्षेम विन्या म्हणे ॥

४

७६ शेतकरी करी शेतावरी काम ।
तयासी व्यायाम कासयासी
नव्वद नव-लक्ष्मी निर्मिती ह्या परी ।
दहांनीं ती थोरी कां सोडावी ?
करूं या मजूरी सगळे मिळून ।
सकलायतन्न स्वराज्य तें
केवढें आरोग्य किती सुख शांति ।
नांदेल जगतीं विन्या म्हणे ॥

५

७७ बुद्धिमंत जरी शेतांत राबती ।
सुधारेल शेती सहज चि
मजूरांचे हाल मग टळतील ।
चितनीं राहेल समतोल
भक्ति आणि भूक उभय प्रेरणा ।
तुष्टतील जनां सकळांच्या
नव्हे गुंतागुंत जीवन सरळ ।
होईल मंगळ **विन्या** म्हणे ॥

६

७८ श्रम निष्ठा जरी धरूं निरपवाद ।
उंच नींच भेद निवारेल
आज तों दुषली वर्ण-योजना हि ।
भेदाचा गंध हि नव्हता जेथें
श्रमाची व्यवस्था म्हणजे वर्ण निष्ठा ।
श्रमाची अनास्था वर्ग-भेद
गाडाया हें भूत अंग मेहनत ।
मंत्र-तुल्य व्रत **विन्या** म्हणे ॥

७

७९ समाज भंगूनि मजूर मालक ।
गरीब धनिक विभागले
गरीब मत्सर धनी तिरस्कार ।
करूनि चतुर म्हणविती
श्रमोपासनेनें समाज सांधणें ।
भेदासी भेदणें चातुर्य तें
भुके पुरतें अन्न अन्ना पुरता श्रम ।
सुवर्ण-नियम **विन्या** म्हणे ॥

८

८० देह-श्रमोपात्त तें चि निज वित्त ।
विनोदावें चित्त तेवढया ने
घरीं आलें धन नावे मधें पाणी ।
टाकावें काढूनि दो हातांनीं
सांचलें तें धन पर-स्व जाणूनि ।
लावावें कारणीं समाजाच्या
करो सेवे साठीं धनाची राखण ।
थोर महाजन **विन्या** म्हणे ॥

९

८१ वांछी जो जीवनीं अहिंसा-पालन ।
सत्य-आराधन निराबाध
त्यास हें श्रमाचें व्रत रामबाण ।
श्रमें सुप्रसन्न मन बुद्धि
अंग-मर्दनानें जळूनि कषाय ।
होय ब्रह्मचर्य स्वाभाविक
देह-परिश्रम सहज वैराग्य ।
साधने चें भाग्य **विन्या** म्हणे ॥

१०

८२ श्रमा माजीं श्रम शेतीचा उत्तम ।
गरज प्रथम पुरवी जो
भूक मानवाची भूक मानवतेची ।
तृप्त होय साची शेतीमाजीं
वृक्ष पशु पक्षी मानव मिळून ।
कुटुंब महान किसानाचें
अपार माधुर्य विशाल बांधव्य ।
जीवन तें दिव्य **विन्या** म्हणे ॥

११

८३ आज सारे शेती करूं न शकती ।
परी ध्येय चित्तीं असू द्यावें
आदर्शी अढळ राखूनिया प्रेम ।

इतर हि श्रम आदरावे
शेतीची पुरवणी मुख्य तें विणकाम ।
कांतण्याचा नेम काल-क्षेम
सुतारी लोहारी कुंभारी चांभारी ।
जीवनोपकारी **विन्या** म्हणे ॥

१२

८४ व्हावे सकळांनीं आपापला भंगी ।
मुरो सर्वां अंगीं श्रम-धर्म
खाय त्यासी करणें मल-विसर्जन ।
त्याचें निस्तरण सहज त्यास
प्रत्यहीं मळासी नीट निरखूनि ।
टाकावें झांकूनि मृत्तीकेनें
येणें लक्ष्मी वाढे आरोग्य हि जोडे ।
देहासक्ति मोडे **विन्या** म्हणे ॥

१३

८५ भंगीकाम नित्य राहो व्यक्तिगत ।
किंवा कुटुंबांत आटोपावें
धंदा म्हणुनी भंगी ज्या कोणी कल्पिला ।
जनीं रूढविला महादोष
श्रम-साधनेचा ह्यास्तव आरंभ ।

शोभवावा शुभ भंगीकामें
अहंता मलीन भंगूनिया भंगी ।
रंगला श्रीरंगीं **विन्या** म्हणे ।।

१४

८६ केवळ शारीर कर्म करी त्यांस ।
कर्माचें किल्बिष न बाधे चि
जाणूनियां संतीं केलीसे मजूरी ।
श्रमाची भाकरी करुनी गोड
नम्रतेची ऊंची माप नसे तीस ।
जाणीव ज्ञानास नसे जेथें
मजूरीचीं कामें तीं च विद्यापीठें ।
जेथ आत्मा भेटे **विन्या** म्हणे ।।

१५

८७ श्रमोपासनेंत कल्पूं नये बाध ।
बाळ रुग्ण वृद्ध यांच्या नांवें
बाल माते माजीं सामावूनि जाय ।
रुग्ण कोण होय निसर्गात
श्रमण तो नव्हे वृद्ध हि अक्षम ।
श्रमाचें हे वर्म अनुभवावें
संकल्प वर्जितां मन होय निष्काम ।
श्रम चि विश्राम **विन्या** म्हणे ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क.

# अभंगांची सूचि

[ आंकडे अभंगांच्या सामान्य अनुक्रमाचे आहेत ]


| | |
|---|---|
| अस्तेय आमुची | ६३ |
| अस्तेय शिकवी | ६६ |
| अस्तेयादि जें जें | ६४ |
| अस्वाद-दृष्टीची | ६० |
| अस्वाद-व्रताची जाणूनि | ५९ |
| अस्वाद-व्रताची दुष्कर | ५१ |
| अस्वाद-साधन | ५२ |
| अहिंसा ही नव्हे | २२ |
| अहिंसेचें नाम अनासक्त | ३१ |
| अहिंसेचें नाम विश्व | ३२ |
| अहिंसेचें सोपे पण | २५ |
| आज सारे शेती | ८३ |
| आदर्श चिंतावा | ५७ |
| आपुलें वेगळें | ३३ |
| ओीश्वरासि मिथ्या | ३ |
| ओुभय दंपती | ३५ |
| औषध मानुनि | ४८ |
| केवळ शारीर | ८६ |
| कोसळो आकाश | २८ |
| क्लेश जिरविण्यांत | २१ |

| | |
|---|---|
| क्षरेल तें [illegible] | ४४ |
| गरज ती खरी | ६९ |
| चुके टेंच लागे | १२ |
| जगावया आम्ही | ७४ |
| जाणणें अवश्य | ३९ |
| दधीचि प्रल्हाद | १३ |
| दंडणें असार | १८ |
| दंपतीची ह्यांत | ३६ |
| देह असे यंत्र | ६२ |
| देह निरोग निर्मळ | ५४ |
| देह-परिश्रम | ७३ |
| देह वश राहे | ४० |
| देह श्रमोपात्त | ८० |
| नित्य पुरवूनि | ५३ |
| परी केवळ साहतां | १९ |
| परी सत्याचें दर्शन | १५ |
| पानें मोजितां | १० |
| बुद्धिमंत जरी | ७७ |
| बुद्धिहीन मीन | ५१ |
| ब्रह्मचर्य जणूं | २९ |

शाखा (स्थळ
क्रो. २२५
दि. २-२-१९

# सत्य

१

सत्य विश्वाचें ह्या मूळ । सत्य धर्माचें जें बळ
सत्याग्रह-तत्त्वसार । सत्य हें चि परमाधार
सत्य आधीं तें उलगडूं । वाणीचे हि दोष फेडूं
सत्य गाऊं सत्य ध्याऊं । **विन्या** म्हणे सत्य पाहूं ॥

२

सत् स्वयें असणारें सत्य असणेंपण
त्याहूनि जें अन्य तें चि शून्य ।
नसे चि जें मूळीं टिकेल तें कैसें
नसे आणि नासे लटिकें वायां ।
वेगळे विरोधी अभाव हे तीन
पदार्थालागून वर्ग होती ।
सत्यसंबंधांत तिन्ही वर्ग एक
जो मिथ्या-नामक **विन्या** म्हणे ॥

३

ईश्वरासि मिथ्या न होणें अगत्य
म्हणूनि तो सत्य स्वयें होय ।

| | | | |
|---|---|---|---|
| ब्रह्मचर्य म्हणजे | ४२ | विषयांचा शब्द | ४३ |
| ब्रह्मचर्य सांगे | ४६ | व्रतमूल स्पर्शी | ५६ |
| ब्रह्मचर्य हेतु | ३७ | व्हावे सकळांनीं | ८४ |
| ब्रह्मचर्य हें पाळावें | ३८ | शेतकरी करी | ७६ |
| ब्रह्मचर्याचें पालन | ४१ | श्रम निष्ठा जरी | ७८ |
| ब्रह्मचर्याशी निगडित | ४७ | श्रमा माजी श्रम | ८२ |
| ब्रह्म सत्यं हा तों | ४ | श्रमोपासनेंत | ८७ |
| भंगी काम नित्य | ८५ | संयमाची मात्रा | ७१ |
| भुके साठीं अन्न | २३ | सत् स्वयें असणारें | २ |
| मग जे विवाह | ३४ | सत्य अहिंसेचा | १४ |
| महाव्रतें पाळूं | ५८ | सत्य कामधेनु | ८ |
| मानसिक चोरी | ७२ | सत्य तें निश्चळ | ६५ |
| येथें अेक मानूं | २६ | सत्य देखण्यांत | ११ |
| रसस्वाद वर्ज | ५० | सत्य बोलणें हा | ६ |
| रोधूं सर्व चि | ४५ | सत्य विश्वाचें | १ |
| लक्षाधीश लोळे | ७५ | सत्याचें ह्या आराधन | ५ |
| लक्षूनियां अहिंसा | ३० | सत्या वेगळें न | ७ |
| लुटावया चोर | १७ | समाज भंगूनि | ७९ |
| वर्जिले हे स्थूळ | ६८ | सादर सहून | २० |
| वस्तुतां अग्नीचा | ६१ | साधकांसि येथें | ९ |
| वस्तु दुसऱ्याची | ६७ | साधन हातींचें | २७ |
| वाढली गरज | ७० | स्वल्प हि सेवन | ४९ |
| वांछी जो जीवनी | ८१ | ह्यांतूनि लाभली | १६ |
| विचारें देहाचा | २४ | | |

# कठिण शब्दार्थ

संग्रह शाखा

अक्षम–पंगु, असमर्थ
अगत्य–अवश्य
अतिरिक्त–जरूरीहून जास्त
अनामय–रोग रहित
अनिवार्य–अपरिहार्य, टाळण्यास कठिण
अन्तराय–अडथळा
अवस्तु–भास, असत्य
असि–तलवार
असंग्रह–अपरिग्रह, संग्रह-त्याग
अस्वामिक–विनामालकाची
आत्मसंमित–आपल्यापुरतें
आत्मसंमित–स्वोचित
आमिष–मांस, लालूच
आवर्जुनी–मुद्दाम
आहार्य–आहारास, पोटांत घालण्यास योग्य
अुच्छेद–समूळ नाश
अुपस्थ–जननेन्द्रिय
अेकविध–अनन्य, अव्यभिचारी
कषाय–मळ, दोष (शारीरिक व मानसिक)
किल्बिष–दोष
कुसरी–कौशल्य, कला
क्षरेल–झिरपेल, ढिले होअील स्खलन पावेल
ख्याति–लोकप्रसिद्धि
गतिशील–जिवंत, वर्धिष्णु, विकासपर
गूजरी–गुजराथी, रहस्यपूर्ण
चाळणा–विचारणा, परीक्षण
जीवनकला–जगण्याची हातोटी
जोजार–झंझट, ओझें, व्याप
डोंबारी–दोरीवर कसला हि आधार न घेतां चालण्याचा खेळ करून दाखविणारा
तमोहन–तमोघ्न, अज्ञान दूर करणारें
दर्शन–सत्य दाखविणारें, शास्त्र
देव-बलात्कार–शारीरिक गरजे-मुळें नाअिलाजास्तव करावा लागणारा श्रम
देह-श्रमोपात्त–शरीरश्रमांतून मिळालेलें
नव-लक्ष्मी–नवीन संपत्ति (अुत्पादित पदार्थांच्या रूपांतली)
नासे–विकार पावतें

निढळ–कपाळ
निस्तरण–विल्हे (लावणें)
निरंजन–निर्लेप, निखळ
निशिली–पाजवली, धारदार केली
निस्तारें–ओलांडून जाण्यानें
परिणमें–परिणत होते
प्रज्ञा–प्रकृष्ट ज्ञान, रहस्य
प्रमा–ज्ञान, निश्चय, बुद्धि
प्रांजळ–निष्कपट, शुद्ध
भंजन–मोडणें
भुलवण्या–भ्रामक वस्तु
मरणान्त–मरेपर्यंत
मिरास–वतन
मूलस्पर्शी–खोलांत शिरणारें वरवरचें नव्हे असें
मोह-मोचन–मोह दूर करणारें
यंत्री–यंत्रचालक
युगल–जोडी
रसोय–रांधण
[illegible]–अंतर्भूत
लोलंगत–चटावत जाऊन, चटावलेला
अनु[illegible]–[illegible] झालेला, अेकाकी

विवर्त–प्रकार, विभिन्न रूपें
विश्लेषण–मनोवृत्तीचें विवेचन पृथक्करण
विसंवाद–विसंगतता
वेंची–खर्चितो अुधळतों
श्रमण–कष्ट करणारा
सकलायतन स्वराज्य–सर्वोदया-विष्ठित राज्य
समवायें–अेकसाथ अेकदम
संजीवन कार्य–अुत्तम कार्यक्षम ठेवण्याचें काम
सार्व भौम–सर्वविषयींची
साटीं–बदल्यांत, अैवजीं
साहाणें–सहाणेवर
साक्षेपेंसी–दक्षतेनें, अुत्साहानें
सुक्रात–सॉक्रेटीस
सषम–जिचीं दोन्ही अंगें समान [illegible]ी वस्तु (सिमिट्रिकल)
[illegible] (लुब्रिकेशन)
[illegible]–अैक्यभाव अस्पृश्यता निवारण
स्वाधीन–हातचें
हस्तामलक–हातांतील आंवळा (तसेंसुलभ होअील)

REFBK-0008077
REFBK-0008077
विभाग ............
क्रमांक ......

# विनोबांचे प्रकाशित वाङ्मय

★

| | | रु. आ. |
|---|---|---|
| १ | मधुकर | १–८ |
| २ | जीवन-दृष्टि | १–१२ |
| ३ | सर्वोदय-विचार | १–४ |
| ४ | क्रांत-दर्शन | १–४ |
| ५ | गीताअी (ठळक) | ०–८ |
| ६ | ,, (लोक नागरी) | ०–४ |
| ७ | ,, | ०–३ |
| ८ | गीता-प्रवचनें | १–८ |
| ९ | गीताध्याय-संगति | |
| १० | स्थितप्रज्ञ-दर्शन | १–८ |
| ११ | गीताअी शब्दार्थ कोष | ४–८ |
| १२ | ,, ,, ,, पक्की बांधणी | ५–० |
| १३ | अुपनिषदांचा अभ्यास | २–० |
| १४ | अीशावास्य वृत्ति | १–८ |
| १५ | स्वराज्य-शस्त्र | ०–१० |
| १६ | ज्ञानदेवाचीं भजनें | १–८ |
| १७ | नामदेवाचीं भजनें | ०–१० |
| १८ | अेकनाथाचीं भजनें | ०–१२ |
| १९ | अेकनाथाचीं भजनें, प्रस्तावना खंड | ०–८ |

| | | |
|---|---|---|
| २० | लोकनागरी लिपि | ०–५ |
| २१ | राम-नाम | ०–८ |
| २२ | तेरा दिवस | ०–८ |
| २३ | वेडछी आश्रमांत | ०–८ |
| २४ | संतांचा प्रसाद | १–० |
| २५ | अभंग-व्रतें | ०–६ |
| २६ | मूल अुद्योग कांतणें | |
| २७ | विचार-पोथी | १–८ |

★

## आगामी प्रकाशन

★ सिंहावलोकन

प्राप्तिस्थान— (१) 'ग्राम-सेवा-मंडळ'-प्रकाशन विभाग,
पो. नालवाडी, जि. वर्धा